PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Pipaani
Year: 2012

Song: Paramesar Parasan
Lyricist:

हे परमेसर परसन
तेनं दिलं दान
हे परमेसर परसन
तेनं दिलं दान
तेनं दिलं दान
परमेसर परसन
तेनं दिलं दान
परमेसर परसन
देवा बाप्पाची किरपा व्हावी
किरपा व्हावी दु:खे पळावी
दु:खे पळावी लक्ष्मी यावी
लक्ष्मी आली सोन पावली
सोन पावली घरा नांदावी
घरा नांदावी हो...
एवढं मागणं आहा
परमेसर परसन
तेनं दिलं दान
तेनं दिलं दान
परमेसर परसन आहा

मिरजाच्या काळी
वढयाला गर्व
काळ्या मातीला सपान हिरवं
घरधनीन काढती तन
पाहून रानं हालतं मन
नागपंचमी पुजावा नाग
नागपंचमी पुजावा नाग
धन्याच्या राहू दे
छातीत वाघ

वाघ राहू दे हो
एवढं मागणं आहा
परमेसर परसन
तेनं दिलं दान
तेनं दिलं दान
परमेसर परसन आहा
हे देवा
हे परमेसरा
काय तरी किरपा कर रं बाबा
काय तरी किरपा कर
माहेराकडून सांगावा आला
श्रावण आला न् आखाड गेला
सयाबायांच्या झुला मनात
मनाचं पाखरू गेलं ढगात
राबतो बंधू गाळतो घाम
राबतो बंधू गाळतो घाम
मोत्याचं दाणं रूप्याचं दाम
रूप्याचं दाम दे
एवढं मागणं
परमेसर परसन
तेनं दिलं दान
तेनं दिलं दान
परमेसर परसन आहा
देवा परमेशा एवढी आशा
तुझ्या लेकरा देई दिलासा
दु:ख दयायाचे खुशाल देईल
त्याला याची परी हिंमत देईल
त्याला याची परी हिंमत देईल
मानसाच्या तू जन्मा घातलं

मानसाच्या तू जन्मा घातलं
मानसावाणी जगाया देई
जगाया देई हो एवढं मागणं
आहा
परमेसर परसन
तेनं दिलं दान
तेनं दिलं दान
परमेसर परसन
तेनं दिलं दान

परमेसर परसन आहा
परमेसर परसन
तेनं दिलं दान
हां तेनं दिलं दान
परमेसर परसन
हां तेनं दिलं दान
परमेसर परसन
हां तेनं दिलं दान
परमेसर परसन

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*